# विशाखा समिती

# (महिला कक्ष)

# अहवाल

# २०१९-२०

# महिला व लिंगसमानता विकास समिती

## *WOMEM AND GENDER DEVELOPMENT CELL*

## विभाग प्रमुख : प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर

Gender Discrimination is a systematic, unfavorable treatment of individuals on the basis of their gender, which denies them rights, opportunities or resources within any given society. The Women and Gender Development Cell (WGDC) is a mandated body as per Section 3.2 (15) of UGC Guidelines (Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment of women employees and students in higher educational institutions) Regulations, 2015.

We believes gender justice on campuses is clearly not an 'isolated operation' requiring quick fix solutions, but an exercise involving a perspectival shift that is able to set down norms of respect, non-discrimination and the unacceptability of any abuse of power, along with robust processes of debate, discussion and dialogue. This has to be the purpose of a new pedagogy within which issues of gender justice are seen as an integral part - not as 'women's issues' to be ghettoized or added on to academic or curricular agendas as a 'requirement' or afterthought. Similar steps need to be taken on issues of gender non-normative behaviours, sexualities and relationships among different genders. Given the realities of a heterogeneous and diverse student body, purely punitive approaches to issues of the 'safety' of women and gender sensitization serves little purpose in terms of meaningful intervention however "well intentioned" they maybe. Instead approaches must be iterative, continuous and sustained focusing on empowering young people through educative, preventive and correctional strategies. The Women and Gender Development Cell (WGDC) therefore is mandated to work towards such processes based on the recognition that women and persons with non-normative behaviours are not 'victims' who need 'protection' rather have agency and capability, which they need to be empowered to exercise effectively. Hence all measures of WGDC are directed at promoting such practices, foster mechanisms that safeguard their fundamental rights and increase their participation and visibility in all realms of the academic world.

Objectives of WGDC:

Understanding and progressively engaging with issues of women, gender, non-normative behaviours, non-binary gender expressions and identifying discriminatory behaviours for initiating dialogue and discussions in the campus.

Conducting outreach work for gender awareness and also identifying those who are facing discrimination, providing support and creating an enabling environment for sharing anxieties, problems and difficulties faced by women and persons with gender non-normative behaviours.

Prevent discrimination and sexual harassment against women and students from LGBTQI communities and promote gender awareness among students and employees.

Make recommendations to the Director for changes/elaborations in the Rules for students in the prospectus and the byelaws, to make them gender just and to lay down procedures for the prohibition, resolution, settlement and prosecutions of acts of discrimination and sexual harassment against women, by students and the employees.

Train and coordinate the work of Gender Champions for gender awareness programmes, workshops and other such activities.

The WGDC therefore on the one hand strives towards activities and programmes to create a gender aware and gender just environment within the campus. At the same time, prepare and capacitate young people with appropriate perspectives, attitudes and skills to work towards creating gender just spaces in the external world outside the Institute.

The WGDC also works in tandem with Internal Committee of college which addresses all complaints of sexual harassment within the Institute as per Section 4 of the UGC Guidelines (Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment of women employees and students in higher educational institutions) Regulations, 2015. The mandate of the Internal Committee is to handle all complaints, provide support to complainants, conduct the hearings and submit appropriate recommendations to the Higher Authorities.

Members of Women and Gender Development Committee :-

Coordinator :-Dr.Kulkarni Jayashri Ramesh
Staff representitive:- Pro. Linge Anita Shatrughn
Pro. Rasal Sahadev Vilas
Shri Patil S.S.
Student’s representitive:- Ku. Khandalkar Divya Dayanand
Ku. Patil Aishwarya Aravind

# WGDC **समिती स्थापना व शपथ समारोह**



महिला कक्ष, महिला व लिंगभाव समानता विकास कक्ष द्वारे आयोजित कक्ष स्थापना व हिंगणघाट जळीत महिला प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन व शपथ समारंभ **दि.०६.०२.२०२०**



# समिती स्थापना व शपथ समारोह

## दि.०६.०२.२०२०

गुरुवार दि. ०६.०२.२०२० रोजी सकाळी ठीक १०.४० वाजता


"WOMEM AND GENDER DEVELOPMENT CELL"(WGDC) च्या वतीने हिंगणघाट जळीत महिला प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर युवती व महिला सुरक्षा विषयक जणीव-जागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रम आणि शपथ समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत "WOMEM AND GENDER DEVELOPMENT CELLच्या समन्वयक प्रा.डॉ. कुलकर्णी जयश्री यांनी सदर प्रकरणावर प्रकाश टाकत मुलींच्या सुरक्षिततेबाबत सर्वांनीच घेण्याची काळजी, मुलांच्या वर्तनावर आवश्यक बंधने व मुली-महिलांबाबत घडणाऱ्या अत्याचाराच्या घटनासंदर्भात जाणीव जागृतीसंदर्भात मार्गदर्शन केले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. चौधरी प्रशांत यांनी "WOMEM AND GENDER DEVELOPMENT CELL"(WGDC)च्या स्थापनेची घोषणा केली व या समिती संदर्भात मार्गदर्शन करून विद्यार्थी-विद्यार्थिनींना खालील शपथ दिली. यावेळी महाविद्यालयातील अंतर्गत मूल्यवर्धन समिती (IQAC) समन्वयक डॉ.अर्चना बनाळे, महाविद्यालयातील अध्यापक-कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

### शपथ


"आम्ही व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद मधील विद्यार्थी-विद्यार्थिनी, अध्यापक व कर्मचारी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट जळीत महिला प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर अशी शपथ घेतो कि, अशाप्रकारच्या 'युवती व महिला अत्याचारविषयक घटना आमच्याकडून कधीच होणार नाहीत. तसेच अशा घटना आमच्या परिसरात आम्ही घडू देणार नाहीत,अशी आम्ही हमी देतो. आमच्या परिसरातील सर्व युवती व महिलांच्या सुरक्षेसाठी आम्ही जीवनभर कटीबध्द राहू."

जय हिंद !

## लिंगभाव समानता’ विषयक चर्चा व मार्गदर्शन कार्यक्रम





महिला कक्ष, महिला व लिंगभाव समानता विकास कक्ष द्वारे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित ‘लिंगभाव समानता’ विषयक चर्चा व मार्गदर्शन कार्यक्रम सोमवार दि. ०९.०३.२०२०






महिला कक्ष, महिला व लिंगभाव समानता विकास कक्ष द्वारे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित ‘लिंगभाव समानता’ विषयक चर्चा व मार्गदर्शन कार्यक्रमात मान्यवर आणि विद्यार्थिनी प्रतिनिधींचे स्वागत करताना मा. प्रा. डॉ. प्रशांत चौधरी, कक्षा प्रमुख प्रा.डॉ.कुलकर्णी जे आर. दि.०९.०३.२०२०






महिला कक्ष, महिला व लिंगभाव समानता विकास कक्ष द्वारे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित 'लिंगभाव समानता' विषयक चर्चा व मार्गदर्शन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ग्रंथालय प्रमुख श्री सचिन महाजन, अध्यक्षीय समारोप करताना मा प्रा डॉ प्रशांत चौधरी, मनोगत व्यक्त करताना प्रा. श्री. अशोक गोरे दि.०९.०३.२०२०









महिला कक्ष, महिला व लिंगभाव समानता विकास कक्ष द्वारे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित 'लिंगभाव समानता' विषयक चर्चा व मार्गदर्शन कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी आणि कर्मचारी



# जागतिक महिला दिनानिमित्त लिंगभाव समानता' विषयक चर्चा व मार्गदर्शन कार्यक्रम

## दि.०९.०३.२०२०

## उद्दिष्ट :

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये लिंगभाव समानता भावना रुजवणे, महाविद्यालय व परिसरात घडणाऱ्या छेडछाड व तत्सम प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून स्त्री-पुरुष कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यामध्ये परस्परांविषयी निकोप व समानतेचा दृष्टीकोन निर्माण करणे, तसेच यासंदर्भात महिला कक्ष, अंतर्गत तक्रार समिती ,महिला व लिंगभाव समानता विकास कक्ष यांची भुमिका विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्यापर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमामागील उद्देश होय.

८ मार्च जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिनाच्या निमित्ताने महाविद्यालायाच्या महिला कक्ष, महिला व लिंगभाव समानता विकास कक्ष यांच्याद्वारे 'लिंगभाव समानता' विषयक चर्चा व मार्गदर्शन कार्यक्रम दिनांक ९ मार्च २०२० रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या ग्रंथालायचे प्रमुख ग्रंथपाल श्री. सचिन महाजन यांनी 'लिंगभाव समानता' या विषयावर विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले आणि चर्चात्मक संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले कि, वर्षानुवर्षे आपल्या समाजात प्रचलित असलेल्या स्त्री-पुरुष भेद आणि पुरुषप्रधानतेमुळे असमानता व स्त्रीविषयक दुय्यम दृष्टीकोन निर्माण झालेला आहे. त्यातूनच अनेक अनुचित प्रकार महाविद्यालये, कामाची ठिकाणे किंवा सार्वजनिक ठिकाणे येथे घडत राहतात. या सर्वावर मत करून समाजात निकोप वातावरण निर्माण करायचे असेल तर लिंगभाव समानता विद्यार्थी दशेतच रुजवणे गरजेचे आहे. यामध्ये शाळा-महाविद्यालयांची भूमिका खूप महत्वाची आहे. प्रमुख वक्त्यांच्या मार्गदर्शनानंतर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.श्री. अशोक गोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांनी अध्यक्षीय समारोप केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यावरांचा स्वागत-सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला कक्ष, महिला व लिंगभाव समानता विकास कक्ष प्रमुख प्रा.डॉ. जयश्री कुलकर्णी यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. संजय जोशी यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.अनिता लिंगे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता सामुहिक पसायदानाने झाली.

## उद्दिष्टपूर्ती :

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये लिंगभाव समानता भावना रुजवणे, महाविद्यालय व परिसरात घडणाऱ्या छेडछाड व तत्सम प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून स्त्री-पुरुष कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यामध्ये परस्परांविषयी निकोप व समानतेचा दृष्टीकोन निर्माण करण्यामध्ये, तसेच यासंदर्भात महिला कक्ष, अंतर्गत तक्रार समिती ,महिला व लिंगभाव समानता विकास कक्ष यांची भूमिका व कार्यपद्धती याविषयीची माहिती विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्यापर्यंत पोहोचवता आली. विद्यार्थ्यांशी झालेल्या चर्चेतून त्यांच्या संदर्भित अडचणी व विचार समजून घेता आले.